**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१४८/२०२०</u>**

# <u>नि.क्र.३४ खालील आदेश</u>

प्रस्तुत अर्जाद्वारे ''कैफियत नाही'' हा आदेश रद्द करून कैफियत दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्याकरिता प्रतिवादी क्र.९ यांनी विनंती केली आहे. वादीने त्यावर म्हणणे देवून या अर्जास जोरदार विरोध केला आहे. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**२.** निश्चितच सदर प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यासाठी पुरेसा वेळ व संधी होती. परंतु सदर वेळेत त्यांनी कैफियत दाखल केली नाही. परंतु केवळ त्यामुळे त्यांना कैफियत दाखल करण्याची संधी नाकारता येणार नाही. अशी संधी दिल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, दाव्याचा व उभय पक्षकारांमध्ये खऱ्या वादाचा निपटारा गुणदोषावर होण्यास मदतच होईल. त्याचप्रमाणे अशी संधी दिल्यास प्रकरण बाहुल्य (Multiplicity of litigation) रोखण्यास सुद्धा मदतच होईल. वादीच्या झालेल्या गैरसोयीची भरपाई त्यास खर्चाचा आदेश करून करता येईल. सबब, हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्याप्रमाणे अर्ज मंजूर करण्यात येतो. प्रतिवादी क्र. ९ यांनी वादीस खर्च रूपये ५००/- देण्याच्या अटीवर ''कैफियत नाही'' हा आदेश रद्द करण्यात येवून त्यांना या प्रकरणात कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.02.12 17:46:28 +0530

**(के. ए. यादव)**
२ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उदगीर

उदगीर
दि.१२/०२/२०२६